



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मिडीयाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २१४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१७ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जितेंद्र आव्हाड यांच्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलच्या वक्तव्याने विधानसभेत गोंधळ

अक्षराज : वृत्तसंकलन

**दि.१६, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेच्या सभागृहात भाषण करताना केलेल्या एका वक्तव्यामुळे मोठा वाद निर्माण झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धर्म स्वातंत्र्य विधेयक विधानसभेच्या सभागृहात सादर केलं. यानंतर या विधेयकावर सभागृहात चर्चा करण्यात येत होती. यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल एक वक्तव्य केलं.

त्यांच्या या वक्तव्यावरुन सभागृहात मोठा गोंधळ उडाला. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० मिनिटांसाठी सभागृहाचं कामकाज तहकूब केलं. यानंतर सभागृहाचं कामकाज सुरु केल्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी जितेंद्र आव्हाड यांना माफी मागण्याचे आदेश दिले. त्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या वक्तव्यावर दिलगिरी व्यक्त केली. यावेळी सत्ताधारी पक्षाचे आमदार प्रचंड आक्रमक झाले. मंत्री नितेश राणे यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर निलंबनाची कारवाई व्हावी अशी मागणी केली.




**मंत्री शंभुराज देसाई आक्रमक**

जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाबाबत एक वक्तव्य केलं. त्या वक्तव्यावर मंत्री शंभुराज देसाई यांनी आक्षेप घेतला. जितेंद्र आव्हाड जो उल्लेख केला ते आपण पहिल्यांदा ऐकतोय. त्यांचा उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून तातडीने काढून टाका, अशी मागणी शंभुराज देसाई यांनी केली. यावेळी तालिका अध्यक्ष संजय केळकर यांनी इतिहासावर वाद न घालता विधेयकावर बोला, असे आदेश जितेंद्र आव्हाड यांना दिले.

**मंत्री दादा भुसे देखील आक्रमक**

जितेंद्र आव्हाड यांनी भावना व्यक्त करत असताना त्यांनी भारताचे महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा घोर अपमान केलेला आहे. महाराष्ट्रात हे बिलकूल चालणार नाही. त्यांना कुणाचं लांगूलचालन करायचं असेल तर ते त्यांना लखलाभ. प्रत्येक समाजात अनेक चांगल्या आणि वाईट प्रवृत्या काही काळापूर्वी होत्या. पण त्यांच्या सोयीप्रमाणे त्यांनी एखादा शब्द असाही बोलायला पाहिजे होता काही समाजात दहा-दहा पत्नी केल्या जातात. त्यावर ते बोलत नाहीत. त्यावर ते भाष्य करत नाहीत. हे संविधानात लिहिलेलं आहे का? छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचा त्यांना कुणी परवाना दिला आहे? जितेंद्र आव्हाड यांनी संपूर्ण महाराष्ट्राची आणि आपल्या देशाची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी मंत्री दादा भुसे यांनी केली.

**विधानसभा अध्यक्ष काय म्हणाले?**

या सभागृहात कामकाज करत असताना कोणत्याही सदस्यासाठी सर्वात दुर्दैवी गोष्ट असते जर आपण केलेल्या शब्दांना रेकॉर्डवरुन काढून घेतलं त्यापेक्षा जास्त त्याच्यापेक्षा जास्त दुखद कोणती गोष्ट असू शकत नाही. जितेंद्र आव्हाड यांनी दिलगिरी व्यक्त करावी.

जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जो उल्लेख केला त्याबाबत मी जितेंद्र आव्हाड यांना या सभागृहाची दिलगिरी व्यक्त करुन माफी मागण्याचे निर्देश देतो, असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले. यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी दिलगिरी व्यक्त केली.

## चंद्रपूर जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्षाचा ९ वा बळी २१ वर्षीय गुराख्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू

अक्षराज : वसंत वडस्कर



**दि.१६, चंद्रपूर :** जिल्ह्यात मानव–वन्यजीव संघर्ष पुन्हा तीव्र झाला असून सोमवारी १६ मार्च वाघाच्या हल्ल्यात २१ वर्षीय गुराख्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. यावर्षी जिल्ह्यात मानव–वन्यजीव संघर्षात मृत्यू झालेल्यांची संख्या आता नऊवर पोहोचली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मामला वनपरिक्षेत्रातील चेक निंबाळा परिसरात राहणारा करण किसन शेडमाके (वय २१) हा गुरे चारण्याचे काम करत होता. सोमवारी दुपारी सुमारे १२.३० वाजताच्या सुमारास तो बैल चारण्यासाठी शेताकडे गेला होता. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक बैलावर हल्ला केला. बैलावर झालेला हल्ला पाहून करणने आरडाओरडा केला. मात्र त्याच वेळी वाघाने करणच्या दिशेने झडप घालत त्याच्यावरही हल्ला केला. या भीषण हल्ल्यात करणचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे सहायक वनसंरक्षक गाठोडे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रियांका येलमे तसेच वनरक्षक गुरु वरखेडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविला. दरम्यान, वनविभागाकडून मृतकाच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत देण्यात आली असून या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात वाढत असलेल्या वाघांच्या वावरामुळे नागरिकांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

## राहुरी व बारामती विधानसभा पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी

अक्षराज : जे. के. पोळ

**दि.१६, मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने देशातील सहा राज्यांतील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील राहुरी (जि. अहिल्यानगर) आणि बारामती (जि.पुणे) या दोन विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले आणि बारामती मतदारसंघाचे आमदार अजित अनंतराव पवार यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्या असून त्यासाठी ही पोटनिवडणूक घेतली जाणार आहे. निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी आवश्यक कार्यक्रम जाहीर केला असून मतदानासाठी सर्व मतदान केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन आणि व्हीव्हीपॅट यांचा वापर करण्यात येणार आहे.

मतदारांची ओळख पटवण्यासाठी मतदार फोटो ओळखपत्र हा मुख्य पुरावा असेल. याशिवाय आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, बँक किंवा पोस्ट ऑफिस पासबुक, मनरेगा जॉब कार्ड, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड आदी कागदपत्रेही ग्राह्य धरली जाणार आहेत.

दरम्यान, निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच राहुरी आणि बारामती मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची माहिती उमेदवार आणि राजकीय पक्षांनी प्रचार काळात तीन वेळा प्रसिद्ध करणे बंधनकारक असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

भारत निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार मतदान २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून मतमोजणी ४ मे २०२६ रोजी केली जाणार आहे. जाहीर कार्यक्रमानुसार ३० मार्च २०२६ (सोमवार) रोजी निवडणुकीसाठी राजपत्र अधिसूचना जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६



एप्रिल २०२६ (सोमवार) निश्चित करण्यात आली आहे. दाखल झालेल्या अर्जांची छाननी ७ एप्रिल २०२६ (मंगळवार) रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल २०२६ (गुरुवार) आहे. त्यानंतर संबंधित मतदारसंघांमध्ये २३ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी मतदान पार पडेल.

मतदानानंतर ४ मे २०२६ (सोमवार) रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. तर संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ (बुधवार) पर्यंत पूर्ण केली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने सर्व यंत्रणांना आवश्यक तयारी करण्याच्या सूचना दिल्या असून आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## ठाणे जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

### साठेबाजी करणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई

अक्षराज : विनोद वास्कर



**दि.१६, ठाणे :** आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य इंधन टंचाईच्या काळात, ठाणे जिल्ह्यातील एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत होऊ नये आणि ग्राहकांना वेळेत सिलेंडर मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी अत्यंत कडक भूमिका घेत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर किंवा अवैध साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. आंतरराष्ट्रीय ऊर्जा चिंतांमुळे केंद्र सरकारने अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा १९६८ लागू केला असून, गॅस वाटपाचा प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे पुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. ग्राहकांनी घाबरून न जाता गरजेनुसारच सिलेंडर नोंदवावे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

जिल्ह्यातील गॅस वितरणाबद्दल माहिती देताना उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्यात सुमारे २ लाख २७ हजार ७४२ घरगुती आणि ४ हजार ४३० व्यावसायिक गॅस जोडणीधारक आहेत. जिल्ह्यात १३ प्रमुख गॅस एजन्सी कार्यरत असून त्यांच्यामार्फत दररोज सरासरी ५ हजार ९२२ घरगुती सिलेंडरची तर ६२२ व्यावसायिक सिलेंडरची आवश्यकता असते. अवैध वापर रोखण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात विविध ठिकाणी १२१ हून अधिक धाडी टाकून तपासणी करण्यात आली आहे.

## भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराला पर्यटनाचा दर्जा

अक्षराज : संजय पंडित

**दि.१६, भिवंडी (ठाणे) :** अखेर शिवक्रांती प्रतिष्ठानचा उपक्रम यशस्वी होऊन भिवंडीतील शिवाजी महाराज शक्तिपीठाला राज्य सरकारकडून 'ब' दर्जा आणि पर्यटन क्षेत्र म्हणून मान्यता मिळाली आहे. भिवंडीतील मराडे पाड्यातील छत्रपती शिवाजी महाराज शक्तिपीठाला राज्य शासनाकडून 'ब' दर्जा मंजूर झाला आहे. सुमारे ७ ते ८ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारलेले हे भव्य मंदिर वर्षभरापूर्वी भाविकांसाठी खुले झाले.

होते. प्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांनी साकारलेली शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती हे या मंदिराचे प्रमुख आकर्षण आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शक्तिपीठाला महाराष्ट्र शासनाने पर्यटन व तीर्थक्षेत्र म्हणून 'ब' दर्जा मंजूर केला आहे. राज्यातील हे पहिलेच भव्य स्वरूपाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर असल्याचे मानले जात असून या निर्णयामुळे या परिसराच्या पर्यटन विकासाला चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच स्थानिक स्तरावर रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे उभारण्यात आलेले हे मंदिर अवघ्या वर्षभरापूर्वी भाविकांसाठी खुले करण्यात



आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि स्वराज्य स्थापनेच्या तेजस्वी इतिहासाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हे शक्तिपीठ उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या उभारणी मागे शिवक्रांती प्रतिष्ठान ट्रस्ट या संस्थेचा पुढाकार असून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि मुख्य विश्वस्त डॉ. राजू चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य प्रकल्प साकारण्यात आला आहे.

मंदिराच्या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे सात ते आठ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. या निधी पैकी काही खर्च प्रतिष्ठानच्या माध्यमातून तर काही निधी लोकवर्गणीतून उभारण्यात आला आहे. मंदिराच्या उभारणीची रूपरेखा आणि संकल्पना ह.भ.प. डॉ. कैलास महाराज निचिते यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली. तर मंदिराचे वास्तुशिल्प आणि अभियांत्रिकी रचना वास्तुविशारद विजयकुमार पाटील यांनी साकारली आहे.

तसेच या मंदिराचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे स्थापित करण्यात आलेली छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती. ही मूर्ती सुप्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांच्या हस्ते साकारण्यात आली आहे. अयोध्येतील भगवान श्रीराम यांच्या मूर्तीची निर्मिती करणारे म्हणून प्रसिद्ध असलेल्या योगीराज यांनी घडविलेल्या या मूर्तीमुळे मंदिराचे आकर्षण अधिक वाढले आहे. हे ठिकाण केवळ धार्मिकच नव्हे तर ऐतिहासिक आणि शैक्षणिक दृष्ट्याही महत्त्वाचे ठरत आहे. या शक्तिपीठात दररोज शिवभक्त आणि पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. विद्यार्थ्यांना शिवकालीन इतिहासाची माहिती मिळावी यासाठी विविध शाळांच्या शैक्षणिक सहलीही येथे आयोजित केल्या जात आहेत. मंदिर परिसरात इतिहासाचे जिवंत दर्शन घडविणाऱ्या शिल्पांमुळे विद्यार्थ्यांमध्येही या ठिकाणा बद्दल मोठी उत्सुकता निर्माण होत आहे.

दरम्यान या शक्तिपीठाला पर्यटन व तीर्थक्षेत्र म्हणून 'ब' दर्जा मंजूर केला आहे. हा मानाचा दर्जा मिळवण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनीही पाठपुरावा केल्याचे सांगितले जाते.

## भटक्या कुत्र्यांचा जीवघेणा हल्ला; महिलेचा दुर्दैवी अंत

**दि.१६, पुणे :** पुण्यातील चाकण परिसरात काल रविवारी पहाटे अंगावर काटा येईल अशी भयंकर घटना घडली. रात्रीच्या अंधारात शांत आणि सामसूम रस्त्यावरून एक महिला चालत जात असताना अचानक भटक्या कुत्र्यांनी तिच्यावर हल्ला केला. काही क्षणातच परिस्थिती भयावह झाली. महिलेने स्वतःचा जीव वाचवण्यासाठी धडपड केली, दगड उचलून कुत्र्यांना हुसकावण्याचा प्रयत्नही केला; पण कुत्र्यांच्या हल्ल्यासमोर ती पूर्णपणे हतबल ठरली. काही मिनिटांतच हा प्रसंग थरारक आणि दुर्दैवी शेवटाकडे वळला. कुत्र्यांच्या या भयावह हल्ल्यात त्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, शोभा विजय वाघमारे असं मृत महिलेचं नाव आहे. त्या मूळच्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील रहिवासी असून सध्या चाकण परिसरात वास्तव्यास होत्या. काल रविवारी पहाटे साधारण दोन वाजेच्या सुमारास त्या आंबेठाण चौकाजवळील उड्डाणपुलाखालून सर्व्हिस रोडने जात होत्या. रस्ता जवळपास ओस पडलेला होता. त्याचवेळी अचानक भटक्या कुत्र्यांनी त्यांच्यावर झडप घातली. कुत्रे सतत भुंकत त्यांच्याभोवती फिरू लागले आणि काही क्षणातच त्यांनी हल्ला चढवला. घाबरलेल्या महिलेनं दगड उचलून कुत्र्यांना दूर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुत्रे अधिकच आक्रमक झाले आणि कुत्र्यांनी त्यांच्या हात, पाय, मान आणि चेहऱ्यावर चावा घेत त्यांना गंभीर जखमा केल्या.

# धन चालवावे युक्ती...



संपूर्ण आठवड्यातला प्रश्नोत्तर तास गोंधळातच वाया गेलेल्या लोकसभेत विचारलेल्या एका लेखी प्रश्नाला केंद्रीय अर्थमंत्रालयाने दिलेल्या उत्तरानं बँकिंग व्यवस्थेतल्या एका वेगळ्याच वास्तवावर प्रकाश टाकला आहे. अर्थमंत्रालयाच्या माहितीनुसार २०२२ ते २०२५ या काळात देशातील सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील बँकांनी किमान मासिक सरासरी शिल्लक न राखल्यामुळे ठेवीदारांकडून सुमारे ८०९२.८३ कोटी रुपये शुल्क म्हणून गोळा केले. यात जनधन योजनेच्या व मूलभूत बचत बँक ठेवींच्या सुमारे ७२ कोटी खातेधारकांचा समावेश नाही. तसं पाहिल्यास ही रक्कम आपल्या बँकिंग व्यवस्थेच्या त्याच काळातील एकूण उत्पन्नाच्या जेमतेम सुमारे ०.२३ टक्के असली तरी देशातील सामाजिक संदर्भामुळं ही रक्कम महत्त्वाची ठरते. अनेक बँका अजूनही सर्वसाधारण बचत खात्यांत किमान मासिक सरासरी शिल्लक (एमएबी) न ठेवल्यास दंड आकारतात. दुसरीकडे स्टेट बँक ऑफ इंडियानं करोनादरम्यान, मार्च २०२०पासून बचत खात्यांवरील किमान शिलकीबाबतचा दंड रद्द केलाय. मागच्याच वर्षी सार्वजनिक क्षेत्रातल्या आणखी काही बँकांनीही असंच पाऊल उचललं आहे.

बँकिंग व्यवस्थेतला यापेक्षाही अधिक मोठा विषय म्हणजे निष्क्रिय खाती आणि मुदत संपूनही न काढलेल्या ठेवी. २०२३पर्यंत सार्वजनिक आणि खासगी बँकांमध्ये मिळून सुमारे ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम अशी होती जी दहा वर्षांपेक्षा जास्त काळ निष्क्रिय खात्यांमध्ये होती आणि नंतर ती ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधीमध्ये (डीईएएफ) हस्तांतरित करण्यात आली होती. यंदा जानेवारीपर्यंत ही रक्कम तब्बल एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली. अर्थात एखाद्या ठेवीदारानं दावा केल्यास बँक ते पैसे परत देते आणि नंतर रिझर्व्ह बँकेकडून परत मिळवते. अलीकडे नरेंद्र मोदी सरकारने बँकिंग व्यवस्थेतील अशा विस्मरणात गेलेल्या ठेवी शोधण्यासाठी उद्गम हे ऑनलाइन पोर्टल तयार केलं आहे. अर्थात बँका या ठेवींचा उपयोग त्यांच्या एकूण निधी व्यवस्थापनात करतात, असे मानले जाते. परंतु कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेतील पैसा हा खेळता असावा; तो तिजोरीत बंदिस्त राहू नये हेही तत्त्व आहेच. तुकोबा हेच तत्त्व 'जोडूनिया धन उत्तम व्यवहारे' अशा वेगळ्या प्रकारे सांगतात. धनाचा वापर योग्य व्यवहाराने, प्रामाणिकपणे आणि समाजहित लक्षात ठेवून व्हावा हे तत्त्व आधुनिक बँकिंग व्यवस्थेलाही लागू होतेच की.

या संदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न अनुत्तरित राहतो. किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल आकारण्यात आलेल्या या आठ हजार कोटींहून जास्त रकमेचा वापर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची बँकिंग सेवा सुधारण्यासाठी, ग्रामीण भागातील शाखा सुविधा, डिजिटल बँकिंगची गुणवत्ता, ग्राहक सेवा किंवा तांत्रिक पायाभूत सुविधा आदींसाठी केला जातो का, याबाबत सरकारने कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नाही.

भारतात शेअर बाजार, विमा पॉलिसी, भविष्यनिर्वाह निधी आणि इतर वित्तीय साधनांमध्येही एकत्रितपणे सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांपर्यंत निनावी आर्थिक मालमत्ता असू शकते आणि ती शोधून योग्य मालकांना परत देण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी असावी, ही अपेक्षा गैर नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या याबाबतच्या निर्देशानंतर बँकिंग नियामक, विमा नियामक आणि बाजार नियामक संस्थांनी अशा मालमत्तेचा मागोवा घेण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या. किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल आकारलेलं हे वार्षिक किंवा अल्पकालीन शुल्क आहे, तर दुसरीकडं लाखो कोटी रुपयांच्या आसपास असलेल्या निनावी ठेवी ही अनेक वर्षांतील निष्क्रिय पण एकत्रित रक्कम आहे.

इथं आणखी एक तुलना उपयुक्त ठरावी. भारत हा जगातील सर्वांत मोठ्या कच्च्या तेल आयातदारांपैकी एक आहे. आपण दररोज सुमारे पाच दशलक्ष बॅरल कच्चं तेल आयात करतो. अमेरिकेनं इराणवर हल्ला करून जगाच्या तेलबाजारातही आग लावली त्याच सुमारास, यंदाच्या फेब्रुवारीत आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाची किंमत ८०–८५ डॉलर प्रति बॅरल मानली तर देशाचा एका दिवसाचा आयात खर्च साधारण ४०० दशलक्ष डॉलर किंवा सुमारे ३,३००–३,५०० कोटी रुपये इतका होतो संसदेतील या प्रश्नाच्या उत्तरातल्या ८,०९३ कोटी रुपयांच्या किमान शिल्लक शुल्कासह वर्षानुवर्षं पडून राहिलेल्या लाखो कोटी रुपयांच्या ठेवी ही सध्याच्या कसोटीच्या काळात देशाच्या सरकारसाठी शिदोरीची भूमिकाही बजावू शकतात.

आज डिजिटल क्रांतीच्या काळात मोबाइल पेमेंट्स, यूपीआय व्यवहार, फिनटेक कंपन्या आणि डिजिटल बँकिंग प्लॅटफॉर्म यामुळे आर्थिक व्यवहारांच्या पद्धती व ग्राहकांच्या अपेक्षाही प्रचंड झपाट्यानं बदलत आहेत. या बदलांच्या पार्श्वभूमीवर बँकिंग शुल्क, किमान शिल्लक अटी आणि निष्क्रिय ठेवींचे व्यवस्थापन यांसारख्या विषयांचा पुनर्विचार करणं आवश्यक व आगामी काळात बँकिंग प्रणालीसमोरचं एक महत्त्वाचं आव्हान रहाणार आहे.

डिजिटल व्यवहारांचं शुल्क म्हणून काही रक्कम आकारल्याचा एसएमएस येत तुम्हाला असेल ना ? त्याचंही एक कारण आहे. गेल्या काही वर्षांत अनेक बँकांच्या नफ्याचा आकडा वाढता वाढता वाढला त्याचं एक कारण रिझर्व्ह बँकेचा एक नियम. त्यासार एखाद्याच्या बचत खात्यावर एका महिन्यात १००पेक्षा जास्त (डिजिटल-प्रत्यक्ष) व्यवहार झाले तर त्यावरही जीएसटीसह विशिष्ट शुल्क लागतं. आज तुम्ही दिवसाला फटाफट डिजिटल व्यवहार करता त्यांची संख्या मोजता तरी का?

थोडक्यात देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेली कोणतीही बँकिंग ही सेवा असली तरी ती सशुल्क व्यवहारच करते! त्या दृष्टीनं त्यांचा प्रत्येक नियम, प्रत्येक शुल्क आणि प्रत्येक धोरण अधिकाधिक समाजाभिमुख व्हावं व सारं काही फुकट मिळत नाही, मिळू नये, हे समाजानंही डोळसपणे स्वीकारावं, ही अपेक्षा गैर कशी मानता येईल? त्यामुळे बँकिंग व्यवस्थेतील नियम आर्थिक तर्कासोबतच सामाजिक संवेदनशीलतेच्या दृष्टीनेही सतत तपासले जाणं आवश्यक ठरतं.

**– मंगेश वैशंपायन**

# बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे.

मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट, टी शर्ट घालतात. त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो तर कधी त्या व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे घालून व्यायाम करतात म्हणून त्यांना महिलांचा राग येतो. असाच एक प्रसंग नुकताच घडला.

प्रसिद्ध मराठी अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर योगासने करतानाचा व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्यांनी व्यायामासाठी सोईस्कर असलेले छोटे कपडे परिधान केले होते. मात्र एका नेटकऱ्याला ही गोष्ट खटकली आणि त्याने त्यांच्या व्हिडिओवर नकारात्मक कमेंट करत थेट सल्ला दिला, कॅमेरा समोर तरी पूर्ण कपडे घालून योगा करत जा. अर्थात या कमेंटवर ऐश्वर्या नारकर यांनी त्या ट्रोल करणाऱ्या नेटकऱ्याचा चांगलाच समाचार घेतला. सोशल मीडियावर ऐश्वर्या नारकर यांनी नेटकऱ्याला दिलेले उत्तर चांगलेच चर्चेत आहे. महिलांना ट्रोल करण्यात सर्वसामान्य नागरिकच आघाडीवर आहेत असे नाही तर समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ – सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## युद्ध दक्ष

महासत्ता युद्धामधे
राहेक्षणोक्षणी दक्ष
कठीणहीचं परिक्षा
घ्यावा कुठला पक्ष

बदलता परिस्थिती
सातत्येराखावे लक्ष
धोरणआखता मात्र
व्हावे अति चाणाक्ष

दोघांच्या वणव्यात
स्वदेश ना हो भक्ष्य
धोक्यायेई नागरिक
होता जरासे दुर्लक्ष

अंतस्थशत्रु सरसावे
टिकाकरती परपक्ष
उलट सुलट घडता
थडाडा बडवत वक्ष

संबंध आंतरराष्ट्रीय
व्यापारावरअपरोक्ष
दाहकता वृध्दी करे
समस्याउभ्या परोक्ष

दीर्घउपाय योजनांत
अडचणी ये अनपेक्ष
दोन्हीअसताना मित्र
जपूनि घ्यायचा कक्ष

एकचंनिर्णय चुकीचा
होईल रे कपाळमोक्ष
युध्द ना सुखद कधी
लागे वेळी सोक्षमोक्ष

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**


# अफवांचा गरम 'बाजार' – तेजीत 'काळाबाजार'

ईस्त्रायल आणि अमेरिका यांनी ईराण वर अट्टाहासाने युद्ध लादले, आणि जगाला वेठीस धरले. गेल्या वर्षी देखील पॅलेस्टाईन बरोबर असेच मिनी युद्ध झाले होते तेंव्हा अमेरिका–ईस्त्रायलला माघार घेण्याची वेळ आली. स्वतः ला जगाचा पोलिस अशा तोऱ्यात वावरणाऱ्या अमेरिकेकडुन नेहमीच दंडेलशाही केली जाते. ईराण मधील तेलावर कब्जा मिळवायचा आहे आणि त्यासाठी अमेरिका ईस्त्रायलला पुढे करुन ईराण मधील सत्ता ऊलथवु टाकायची आणि आपल्या मर्जीतील सरकार आणुन तेल व्यापारावर नियंत्रण मिळवायचे हा अमेरिकेचा अट्टाहास आहे.

आता जवळपास तेरा चौदा दिवस होतील युद्ध संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. अमेरिकेच्या शक्तीपुढे ईराण कितीकाळ तग धरणार असे वाटत असतांना आता ईराण वरचढ ठरु लागला आहे असे काहिसे चित्र निर्माण झाले आहे आणि अमेरिकेने केलेली नसती ऊठाठेव अंगाशी येऊ लागली आहे. मात्र या युद्धाने जगाची चिंता वाढवली आहे याला कारण म्हणजे आखाती देशांकडून होणारा तेल पुरवठा आणि त्यावर जगाचे अवलंबून असलेले अर्थकारण. त्यातच ईराणचा ताबा असलेल्या झार्मूज खाडी ईराण ने वाहतुकीसाठी बंद केली आणि केवळ मित्र देश असलेल्या चीन आणि रशिया यांच्या जहाजांना वाहतुकीची परवानगी दिली आहे. ईराण आजवरचा भारताचा जुना मित्र, ईराण कडुन भारताला तेल पुरवठा होत होता मात्र अमेरिकेच्या दबावामुळे आपण ईराण तसेच रशिया कडुन तेल खरेदी कमी केली याचा परिणाम आता देशात गॅस, तेल पुरवठ्यावर जाणवु लागला आहे तसा तो इतर देशांमधे देखील जाणवत आहे.




संकट काळात सर्वांनी एकजुट होऊन संकटाचा सामना केला पाहिजे आणि यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे हे अपेक्षित आहे मात्र गॅस तुटवड्याची चाहुल लागताच सरकारने घरगुती गॅस आणि व्यावसायिक गॅसची किंमत वाढवली. व्यावसायिक गॅसचे बुकिंग बंद झाले, घरगुती गॅस बुकिंग चा कार्यकाळ वाढवला, त्यामुळे सहाजिकच जनतेमधे संभ्रम निर्माण झाला आणि या संकटात लुटीची संधी जिकडेतिकडे साधली जात आहे कुठे ब्लॅक ने गॅस विक्री होत आहे तर कोणाकडे मोठ्या संख्येने गॅस सिलेंडर सापडत आहेत.


**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

व्यवसायिक गॅस सिलिंडर मिळत नसल्याने अनेक हॉटेल व्यवसायिक, औद्योगिक कारखाने, छोटे मोठे ऊद्योग व्यवसाय काही प्रमाणात बंद होत आहेत. गॅस साठी लांबच लांब रांगा लागत आहे तर अनेक ठिकाणी हाणामारी चे प्रसंग ओढवत आहे. त्यातच संकटात लुटीची संधी साधत काही विमान कंपन्यांनी अव्वाच्या सव्वा भाडेवाढ केली आहे. सरकार कडुन देखील अधिकृत माहिती वेळेत दिली नाही दहा बार दिवसानंतर पेट्रोलियम मंत्र्यानी संसदेत निवेदन केले. गॅस इंधनाचे संकट आहे मात्र सरकार ते खुल्या मनाने मान्य करत नाही यामुळे अफवांचा बाजार आणि काळाबाजार दोन्हीही तेजीत आहे. काही ठिकाणी पाईप लाईन द्वारे तसेच सिलेंडर द्वारे पुरवठा सुरळीत आहे तर अनेक ठिकाणी ग्राहकांचे बुकिंग होत नाही कि सिलेंडर मिळत नाही.

सरकार म्हणते जनतेने पॅनिक होऊ नये कि कोणीही अफवा पसरवु नये मात्र परिस्थितीच अशी असते कि जनतेच्या मनात चलबिचल होणे अपरिहार्य ठरते. अफवा पसरविणाऱ्या विरूद तसेच काळाबाजार, नफेखारांविरूद्ध कठोर कारवाई तितक्याच तत्परतेने होणे गरजेचे आहे मात्र अनेकदा कारवाया तोंडदेखलेपणाच्या ठरतात. कोरोना काळात देखील अशीच परिस्थिती होती. तेव्हा देखील माणुसकीला काळिमा फासत अनेकांनी लुटीची संधी साधली होती आणि जनता लुटली गेली होती. डॉक्टरी, दवाखाने, हॉस्पिटल्स, मेडिकल यांच्या बरोबरच शाळा, शिक्षण संस्था, शासन प्रशासनातील झारीतील शुक्राचार्य यांनी लुटीची संधी साधली. नोटबंदी काळात देखील जनता याच अनुभवातुन गेली. आतातर काही ठिकाणी गॅस संकट म्हणून अधिकच शुल्क आकारण्यात येत आहे.

अजुनही युद्ध किती काळ चालेल याबाबत अनिश्चितता आहे आणि युद्ध संपल्यावर देखील परिस्थिती सुधारण्यासाठी काही काळ जावा लागेल जसजसे दिवस जातील तसतशी परिस्थिती बिकट होत जाणार, अगोदरच आर्थिक संकट, महागाई, बेरोजगारी चा सामना करतांना सगळ्यांचीच दमछाक होत आहे. युद्धाचा परिणाम सर्वच गोष्टींवर होणार अशावेळी सत्ताधारी आणि विरोधक यांनी एकमेकांना पूरक भुमिका घेऊन जनतेला धीर द्यायला हवी. जनतातर सरकार वर विश्वास ठेवते पण सरकारने देखील जनतेवर विश्वास ठेवायला हवा. या सगळ्यांत अफवांचा गरम बाजार तर तेजीत काळाबाजार मात्र सुरू आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राष्ट्रीय महामार्गावर टिपर व दुचाकीचा अपघात, एका युवकाचा जागीच मृत्यु



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१६, मुखेड (नांदेड) :** नांदेड - बिदर (१६१ अ) या राष्ट्रीय माहामार्गारील विठ्ठल मंदिर जवळ लेंडी धरणातील काळ्या मातीची वहातुक करणाऱ्या टिपरने एका दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या युवकाच्या दुचाकीला धडक दिली व युवक खाली पडला असता त्यावरून टिपर गेल्यामुळे युवकाचा जागीच मृत्यु झाला असल्याची घटना दि.१६ मार्च रोजी दुपारी ३ वजण्याच्या सुमारास घडली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, राष्ट्रिय महामार्ग क्र १६१ अ वरील निवळी शिवारात विठ्ठल मंदिराजवळ महामार्गावरील पुलाचे काम रखडले आहे. त्यामुळे याठिकाणी रस्ता अरुंद आहे त्यामुळे यापुर्वीही याठिकाणी अनेक अपघात झाले आहेत या अपघातात आजपर्यंत ११ ते १२ नागरीकांचा मृत्यु झाला आहे याच ठिकाणी पुलाचे काम न झाल्यामुळे येथिल महामार्गावरून पावसाळयात नाल्याचे पाणी जाऊन येथिल रस्ताही खचला असल्याकारणाने नांदेड जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी सहा महिन्यापूर्वी एक आदेश काढून हा महामार्ग या ठिकाणी बंद केला. परंतु तो फक्त कागदावरच बंद राहील्यामुळे येथुन फक्त महामंडळाची एस टी.बस वगळता सर्वच वहातुक सुरू आहे . या मार्गावरून काळ्या मातीचे टिपर, रेतीचे टिपर, उसाचे ट्रॅक्टर, विटाचे ट्रक यासह सर्वच प्रकारची जड वहातुक सुरु आहे.

त्यातच दि.१६ मार्च रोजी दु.३ वाजण्याच्या सुमारास भेंडेगाव (बु) येथिल युवक संतोष रामराव कांबळे (२५) हा बाऱ्हाळीकडे दुचाकी क्र.एम.एच.२६ एक्स १३८४ वरून येत असताना पाठीमागुन भरधाव वेगाने येणारा टिपर क्र.एम.एच.२४ ए.बी.८८८० विठ्ठल मंदिर जवळील त्याच नाल्यावर दुचाकी व त्यावरील युवकाला चिरडून गेले त्यात युवकाचा जागीच मृत्यू झाला. अशा घटना या महामार्गावरील या ठिकाणी वारंवार घडत आहेत त्यात अनेकांचा नाहक जीव जाऊन संसार उघड्यावर पडत असताना प्रशासन मात्र उपायोजना न करता केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे अजून किती लोकांचा जीव गेल्यावर याठिकाणी थांबलेले काम पूर्ण करणार असा प्रश्न या भागातील जनता विचारत आहे. एवढेच नाही तर जिल्हाधिकारी यांनी बंद केलेल्या या रस्त्यावरून जड वाहतुक सुरू कुणी केली ? याकडे प्रशासणाचे जाणीपूर्वक दुर्लक्ष होत आहे. असे करणाऱ्यावर कार्यवाही केली जाईल का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

## मुंबई महापालिका सेवानिवृत्त विभागीय सुरक्षा अधिकारी अर्जुन काळीराम पाटील यांचे निधन



**अक्षराज : दिलीप अहिनवे**

**दि.१६, ठाणे :** बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल विभागात ३६ वर्षे ३ महिने सेवा करून १ जून २०१५ रोजी विभागीय सुरक्षा अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त झालेले अतिशय शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकारी अर्जुन काळीराम पाटील यांचे शुक्रवार दि.१३ मार्च २०२६ रोजी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. अर्जुन पाटील यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कोपर गावात शेतकरी कुटुंबात झाला. अतिशय खडतर परिस्थितीत त्यांनी आपले शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करुन १८ फेब्रुवारी १९७८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेत कामगार या पदावर नियुक्ती झाली. आपल्या कष्टाने आणि जिद्दीने १८ फेब्रुवारी १९८० रोजी सहाय्यक सुरक्षा अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'ई' विभाग कार्यालयात कर्तव्यावर असताना सन १९९१ मध्ये मुंबईमध्ये झालेल्या जातीय दंगलीत दिवस रात्र काम करुन विभाग कार्यालयात आणि इतर कर्तव्याच्या ठिकाणी कुठेही जिवीत अथवा वित्तीय हानी होऊ दिली नाही . सन १९९८ ते २००० या कालावधीत लोकमान्य टिळक रुग्णालय सायन येथे कार्यरत असताना महानगरपालिका कर्मचारी संपात सुरक्षा रक्षक सुद्धा सहभागी झाले होते. अशा परिस्थितीत नविन ६ सुरक्षा रक्षकांना सोबत घेऊन रूग्णालयाच्या कामकाजात कोणताही खंड पडू दिला नाही. सन २००२ ते २००७ नगरबाह्य विभागातील पिसे पांजरपोळ येथे नेमणूक असताना रात्रंदिवस गस्त घालून पाणी गळती आणि पाणी चोरीला चाप बसवला. सन २००७ ते २०११ या कालावधीत 'बी' विभागात नेमणूक असताना पी. डिमेलो रोड वरील अनधिकृत अतिक्रमणे हटवून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करुन दिला. सन २०११ ते २०१४ या कालावधीत देवनार पशुवधगृह येथे नेमणूक असताना प्रत्येक बकरी ईद व साप्ताहिक मंडीच्या वेळी योग्य तो सुरक्षा बंदोबस्त व मार्गदर्शन करुन कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही. परिणामी १२ मार्च २०१४ रोजी विभागीय सुरक्षा अधिकारी या पदावर पदोन्नती देऊन भरती आणि प्रशिक्षण या महत्त्वाच्या विभागाची जबाबदारी प्रशासनाने दिली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी व खुप मोठं पाटील कुटुंब आहे.

## जिंतूर तालुक्यातील कोक गावात दुबार मतदारांवर कारवाईची प्रक्रिया सुरू



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१६, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील कोक गावात मतदार यादीतील दुबार नावे वगळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. गावात गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई संभाजीनगर पुणे परभणी हैदराबाद वास्तविक असलेल्या लोकांची दोन ठिकाणी नावे दिसून येत आहे काही व्यक्तींची नावे दोन वेगवेगळ्या ठिकाणी मतदार यादीत नोंद झाल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित नागरिकांनी स्वखुशीने आपले एक नाव वगळण्यासाठी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी डेमो अर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

जर कोणीही आपले नाव स्वेच्छेने वगळले नाही, तर निवडणूक नियमांनुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे. त्यामुळे ज्या व्यक्तींची नावे दोन ठिकाणी आहेत त्यांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माथेरानमध्ये स्मार्ट वीज मीटरवरून संभ्रम; जागरूकता बैठकीनंतरच बसविण्याची मागणी




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१६, माथेरान :** माथेरान शहरात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून जुन्या मीटरऐवजी स्मार्ट वीज मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिल वाढण्याची भीती अनेक वीज ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या विषयावर माथेरान वीज वितरण संघर्ष समितीच्या वतीने महावितरणकडे निवेदन देण्यात आले आहे. स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी नागरिकांना पूर्वकल्पना देऊन, त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी व जागरूकता बैठक घेतल्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

हे निवेदन स्वीकारताना सहायक अभियंता सचिन आटपाडे यांनी नागरिकांसाठी जागरूकता बैठक आयोजित करण्यास सहमती दर्शवली असून, साधारण एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात लघु चर्चासत्र आयोजित केले जाईल, असे सांगितले. तोपर्यंत, संबंधित कर्मचारी स्मार्ट मीटर बसविण्यास सक्ती करत असल्यास, त्याची माहिती समितीच्या पदाधिकाऱ्यांना द्यावी, असे आवाहनही समितीने केले आहे.

महाराष्ट्र सोडल्यास इतर राज्यांमध्ये वीज ग्राहकांना वीज वहन दर आकारला जात नाही, हा दर फक्त महाराष्ट्र राज्यातच आकारला जातो, जो अवैध रित्या आहे.स्मार्ट मीटर बदलणे किंवा लावणी हे कायद्याने बंधनकारक नाही. त्यामुळे ग्राहकांच्या मान्यतेनंतरच स्मार्ट मीटर बसवावे. मीटर ची कार्यपद्धती, त्याचे फायदे, बिलिंग प्रणाली या बाबत नागरिकांच्या शंकांचे निरसन होणे आवश्यक आहे.

**- जनार्दन पार्ट (सामाजिक कार्यकर्त्य)**

---

नवीन स्मार्ट मीटर बाबत अनेक गैरसमज नागरिकांमध्ये आहे. त्या संदर्भात आम्ही लवकरच ग्राहकांसाठी जनजागृती लघु चर्चासत्र आयोजित करणार आहोत. नवीन स्मार्ट मीटर मध्ये रीडिंग वाढणे असा कोणताही प्रकार घडत नाहीये आणि जे नवीन मीटर आहे ते अदानी कंपनीचे नाहीयेत हा गैरसमज आहे एम एस सी बोर्डाचे जुन्या मीटरमुळे बरेच नुकसान होत होतं. विच चोरी वेळेवर बिल न भरणे अशा अशा अनेक घटनांना आता स्मार्ट मीटरमुळे आळा बसणार आहे आणि नागरिकांना वेळच्यावेळी बिल भरणे कमप्रात होणार आहे.

**- सचिन आपटे**
**(सहाय्यक अभियंता महाराष्ट्र विज वितरण मंडळ माथेरान)**

## राहुरीतील वर्धमान ज्वेलर्स चोरी प्रकरणातील ५ लाखांचे सोन्याचे दागिने फिर्यादीस परत




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१६, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी येथील वर्धमान ज्वेलर्स दुकानातील चोरी प्रकरणात जप्त करण्यात आलेले सुमारे ५ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादीस परत देण्यात आले असल्याची माहिती राहुरी पोलिसांनी दिली आहे.

दि. १३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.०० ते १४ जुलै २०२५ रोजी सकाळी ६.०० या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी राहुरी येथील वर्धमान ज्वेलर्स दुकानाच्या शटरचे सेंटर लॉक हत्याराच्या साहाय्याने तोडून दुकानात प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील सुमारे ६० लाख ४५ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने तसेच डीव्हीआर चोरून नेण्यात आले. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गु.र. नं. ७८३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५ (अ) व ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक तपास करून आरोपी १) विकीसिंग जालिंदरसिंग कल्याणी (रा. रामटेकडी, हडपसर, पुणे), २) अतुल सुरेश खंडागळे (रा. रामटेकडी, हडपसर, पुणे), ३) सिंगरुसिंग टाक (रा. मुंबई), ४) टिलुसिंग टाक (रा. मुंबई), ५) विजय उर्फ टिड्डा जुन्नी व ६) सोनुसिंग जुन्नी यांनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार असल्याचेही तपासात समोर आले.

पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे व त्यांच्या पथकाने विकीसिंग कल्याणी व अतुल खंडागळे यांचा शोध घेऊन त्यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या मालापैकी एकूण ४ लाख ९५ हजार २६९ रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. यामध्ये १ लाख ६७ हजार ३६५ रुपये किंमतीचे २२ कॅरेटचे मिनी गंठण पोत तसेच ३ लाख २७ हजार ९०४ रुपये किंमतीचा सुमारे ३५.०७० ग्रॅम वजनाचा सोन्याचा लगड तुकडा जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेले हे दागिने प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, राहुरी यांच्या आदेशानुसार फिर्यादी सौरभ राजेंद्र भन्साळी (रा. अनिल तनपुरे कॉलनी रोड, राहुरी) यांना ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवार यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

## रयत चषक क्रिकेट स्पर्धेत 'टीआरपी' संघ ठरला अजिंक्य; बागलाण लॉयन्सला उपविजेतेपद



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील शाळांसाठी आयोजित 'स्वर्गीय अजितदादा पवार रयत सेवक क्रिकेट स्पर्धा २०२६'चा १५ मार्च रोजी उत्साहात समारोप झाला. या अटीतटीच्या स्पर्धेतरुई-टाकळी-पांगरी (टीआरपी) संघाने अंतिम सामन्यात विजय मिळवत विजेतेपदावर आपले नाव कोरले, तरबागलाण लॉयन्स (आसखेडा) संघ उपविजेता ठरला.

**स्पर्धेचा थरार आणि नेट रनरेटचा पेच**

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता.

पहिला दिवस : शनिवारी झालेल्या साखळी सामन्यांमधून 'टीआरपी' (रुई-टाकळी-पांगरी) संघाने दिमाखात फायनलमध्ये धडक मारली.

दुसरा दिवस : रविवारी 'क' गटात मोठी चुरस पाहायला मिळाली. आसखेडा, साकोरा आणि चांदोरी या तिन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला होता. विशेषतः चांदोरी संघाने साकोराचे ८८ धावांचे आव्हान अवघ्या ४.३ षटकांत ९० धावा कुटून पूर्ण केले. मात्र, सरतेशेवटीनेट रनरेटच्याजोरावर आसखेडा संघाने सेमीफायनलमध्ये प्रवेश केला.

उपांत्य व अंतिम फेरी : सेमीफायनलमध्ये आसखेडा संघाने दापूरचा पराभव केला. मात्र, अंतिम सामन्यात 'टीआरपी' संघाने आसखेडा संघावर एकतर्फी विजय मिळवत चषकावर ताबा मिळवला.

**मान्यवरांची उपस्थिती आणि कौतुक**

स्पर्धेदरम्यान दिंडोरी लोकसभेचेखासदार भास्करराव भगरेयांनी भेट देऊन खेळाडूंचा उत्साह वाढवला. बक्षीस वितरण समारंभास रयत शिक्षण संस्थेचेव्हाईस चेअरमन भगीरथ काका शिंदे उपस्थित होते.शिक्षकांमधील हा खेळाडूवृत्तीचा उत्साह त्यांच्या अध्यापन कार्यातही दिसून येतो. खेळामुळे शरीर आणि मन सुदृढ राहते, ज्याचा फायदा उत्तम विद्यार्थी घडवण्यासाठी होतो, असे मत भगीरथ काका शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी डॉ. सुजित गुंजाळ, मनोज कवडे, सदाबापू कापडणीस, माणिकशेठ गायखे, केंगे साहेब, वामनराव जेऊघाले, डॉ. योगेश चांडक आणि मैदानासाठी सहकार्य करणारे दत्तूलाल शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

**वैयक्तिक पारितोषिके**

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला:

उत्कृष्ट फलंदाज : राकेश खैरनार (टाकळी विंचूर विद्यालय)उत्कृष्ट गोलंदाज : नितीन काळे (रुई विद्यालय) सामनावीर (Man of the Match) : यशवंत भोई, मिलिंद पाटील, नितीन ठुबे, पी.आर. जाधव, अभिजीत देशमुख, भाऊसाहेब कांदे आणि डूडवे सर.

**विशेष सत्कार आणि आभार**

कार्यक्रमात राज्यस्तरावर चमकणाऱ्या विद्यार्थी खेळाडूंचा ही गौरव करण्यात आला. लासलगावच्या प्रथम महिला सरपंच स्वर्गीय कुसुम ताई होळकर यांच्या स्मरणार्थ होळकर परिवाराने विजेत्यांना चषक प्रदान केले. तसेच राजेंद्र चांदे यांनी त्यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ सामनावीर पुरस्कार प्रायोजित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र चांदे यांनी केले, तर सूत्रसंचालन चांदे व घनश्याम मोरे यांनी केले. आभार जितेंद्र अहिरे यांनी मानले. विंचूर गटाचे गटप्रमुख प्राचार्य नंदकुमार देवढे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे कौतुक केले.

## राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या सदस्यांकडून योजनांचा आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य वड्डेपल्ली रामचंदर यांनी सोमवारी (दि. १६) अनुसूचित जातीच्या नागरिकांसाठी असलेल्या योजनांचा आढावा घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या. यावेळी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे संचालक सुनीलकुमार बाबू उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक एम. रामानुजन, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, खाजगी सचिव क्रांती कुमार, अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, अधिक्षक अभियंता (महावितरण) संध्या चिवंडे, पालिका प्रशासन अधिकारी डॉ. विद्या गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी वड्डेपल्ली रामचंदर म्हणाले, अनुसूचित जातीच्या नागरिकांना घरपट्टे किंवा घरकुल प्राधान्याने द्यावे. रोजगार, स्वयंरोजगारासाठी बँकांनी त्यांना कर्ज उपलब्ध करून द्यावे, याबाबत जिल्हा अग्रणी बँकेने पाठपुरावा करावा. प्रधानमंत्री रोजगार गॅरंटी आणि मुख्यमंत्री रोजगार गॅरंटी योजनेची मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. अनुसूचित जातीच्या लोकांना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी उद्योग विभागाने त्यांचे प्रस्ताव त्वरीत बँकांकडे पाठवावे. अत्याचाराच्या घटना घडल्या तर त्यावर पोलिस विभागाने त्वरीत पीडितांना न्याय द्यावा. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेची माहिती द्यावी, अशा सुचना त्यांनी केल्या. यावेळी रामचंदर यांनी अनुसूचित जातीच्या मुलामुलींची वसतीगृह प्रवेशस्थिती, शाळांची संख्या, केंद्र पुरस्कृत नवभारत साक्षरता अभियान, आरोग्य आणि पोषण, ॲक्ट्रोसिटीची प्रकरणे, ग्रामीण पाणी पुरवठा, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, बँकांची कर्ज प्रकरणे आदींचा आढावा घेतला.

